# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/12/2023 (मंगळवार) दुपार

---

### जबरी संभोग

**पोस्टे कन्हान:—** फिर्यादी ही एक मुलगी वय ०९ वर्षे व मुलगा वय ०५ वर्षे असे परीवारासह राहते व रोजमजूरीची कामे करते. विधीसंघर्ष बालक वय १७ वर्षे हा फिर्यादीच्या घराच्या समोरच्या बाजूलाच राहतो त्याला फिर्यादी मागील दहा वर्षापासून ओळखते. दिनांक २४/१२/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा. दरम्यान फिर्यादी ही घरी हजर असताना फिर्यादीचा लहान मुलगा याने फिर्यादीला सांगितले की, विधीसंघर्ष बालकाने फिर्यादीच्या मुलीशी जबरी संभोग केला ''तुला कसे माहित?'' असे फिर्यादीने त्याला विचारले असता फिर्यादीचा भासरा वय ०६ वर्षे याने सांगितल्याचे सांगितले. याबाबत फिर्यादीने फिर्यादीच्या अल्पवयीन पिडीत मुलीला विचारणा केली असता तिने सांगितले की, दिनांक २३/१२/२०२३ चे दुपारी १२/०० वा. ते ०१/०० वा. दरम्यान फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी आणि फिर्यादीचा भासरा साईकलने गाईच्या झोपड्याकडे जात होते तेव्हा विधीसंघर्ष बालक फिर्यादीच्या मुलीच्या पाठीमागे आला. फिर्यादीचा भासरा गाईच्या झोपड्यात गेला म्हणून फिर्यादीची मुलगी पण त्याच्या पाठीमागे झोपड्यात गेली तेव्हा विधीसंघर्ष बालक पण त्यांच्या पाठीमागे झोपड्यात आला व कुत्र्याला खेळवत होता. फिर्यादीच्या मुलीने त्याला कशासाठी आला? म्हणून विचारले तर विधीसंघर्ष बालक ''मग सांगतो'' असे म्हणाला आणि त्याने फिर्यादीचा भासरा याला कुत्र्याला घेवून बाहेर पाठविले. विधीसंघर्ष बालक याने फिर्यादीचे मुलीसोबत शारीरीक संबंध प्रस्थापित केले असे यातील फिर्यादीची मुलगी हीने फिर्यादीस सांगीतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे विधीसंघर्ष बालक यांचे विरूद्ध ३७६ (अ),(ब), ३७६(२), (फ), ३७६(२)(जे), ३७६ (२)(एन) भादंवि. सहकलम ४, ८, १० बालकांचे लैंगीक अपराध संरक्षण अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बेन्द्रे, मो. नं. ९०९६३२६०१२ हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा झुल्लर फाटा, भंडारा नागपुर रोड येथे दिनांक २५/१२/२०२३ चे ००.०० वा. ०२.३४ वा. दरम्यान फिर्यादी नामे— हेमंत चंद्रशेखर खराबे, वय २७ वर्ष, रा. श्रीनगर लापका रोड ता. मौदा याचे मॅनेजर यांनी फिर्यादीला फोनवर माहिती दिली कि, **Pine labs** कंपनीची **Pose (card Swipe)** मशिन ही दिसुन येत नाही त्या माहितीवरून फिर्यादी यांनी पेट्रोलपंप येथे जावुन सी. सी. टी. व्ही फुटेज चेक केले असता एक इसम हा पेट्रोलपंप जवळ येवुन पेट्रोल भरण्याची एमपीडी मशिन हिला छेडछाड करतांना दिसुन आला व थोडया वेळानंतर त्याने **Pine labs** कंपनीची **Pose (card Swipe)** मशिन अंदाजे किंमती १,००,०००/—रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार असलम नवरंगाबादे मो. नं. ८६६८८१६०४९ **हे** करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**